# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.03.2025** **वारःशनिवार**

---

1. वंचित वर्गाप्रती संवेदनशीलता ही देशाची प्रतिष्ठा असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
2. गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात राष्ट्रीय सुरक्षितता बळकट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन
3. लंडनच्या हिथ्रो विमानतळावरची उड्डाण सेवा पूर्ववत
4. दिव्यांगांसाठीच्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची तीन सुवर्णपदकांना गवसणी आणि
5. चेन्नईतल्या स्क्वॅश स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंग आणि वीर चोत्राणी यांना विजेतेपद

**<u>राष्ट्रपती</u>**

वंचित वर्गाप्रती असलेली संवेदनशीलता ही समाजाची आणि देशाची प्रतिष्ठा ठरवते, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल राष्ट्रपती भवनात आयोजित पर्पल फेस्ट कार्यक्रमाला संबोधित करताना बोलत होत्या. करुणा, सर्वसमावेशकता आणि सलोखा ही भारतीय संस्कृतीची मूल्ये असून अपंगत्वाचा लोकांच्या जीवनावर होणारा परिणाम याविषयी जनजागृती करणं आणि अपंग व्यक्तींना समाजात समजून घेणं, स्वीकारणं हा 'पर्पल फेस्ट'चा उद्देश असल्याचं राष्ट्रपती मुर्मू यावेळी म्हणाल्या. सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयांतर्गत अपंग सक्षमीकरण विभागातर्फे दिव्यांगजनांची प्रतिभा दर्शविण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात दिव्यांगजनांचे सांस्कृतिक सादरीकरणही आयोजित करण्यात आलं होतं. यावेळी अपंगव्यक्तींनी तयार केलेल्या उत्पादनांच्या प्रदर्शनाला सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला

**<u>राष्ट्रपती-एआयएमएमएस</u>**

मानसिक आरोग्याशी निगडीत जागरुकता मोहीम राबवून नागरिकांना या सुप्त आजाराची जाणीव करून देण्याचे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी काल दिल्लीत अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था म्हणजेच एम्सच्या अधिकारी, प्राध्यापकांना केलं. भावनिक आरोग्य हे एक महत्त्वाचे आव्हान झाल्याचे त्या म्हणाल्या. एम्सचा 49 वा दीक्षांत समारोह सोहळा राष्ट्रपतींच्या हस्ते काल पार पडला त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी केंद्रीय आरोग्य कल्याण मंत्री जे पी नड्डा यांनी एम्सने कृत्रिम बुद्धिमत्ता संचलित रोगनिदान आणि यंत्रमानवी शस्त्रक्रिया यामध्ये अव्वल स्थान निर्माण केल्याचं सांगितलं.

**<u>अमित शहा</u>**

केंद्र सरकारने दहशतवादाचा बिमोड करण्याचे धोरण अवलंबले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात जम्मू काश्मिरमधील दहशतवादामुळे होणाऱ्या मृत्युंमध्ये 70 टक्के घट झाली असून दहशतवादाच्या घटनांही कमी झाल्याचं गृहमंत्री अमित शहा यांनी काल राज्यसभेत स्पष्ट केलं. गृहमंत्रालयाच्या कामकाजाशी निगडीत चर्चेला ते उत्तर देत होते. गेल्या दहा वर्षांत सरकारने जम्मू-काश्मिर मध्ये दहशतवाद, नक्षलवाद आणि पुर्वोत्तर राज्यांमधील घुसखोरी या तीन मोठ्या आव्हानांचा सामना केला आहे. केंद्र सरकारने कलम 370 दूर करुन संविधानकर्त्यांचे एक संविधान एक ध्वज हे स्वप्न प्रत्यक्षात साकारले आहे, असं सांगून पुढील वर्षाच्या मार्चपर्यंत नक्षलवादाचा बिमोड करण्यात येईल असं आशा त्यांनी व्यक्त केली. गेल्या दहा वर्षात राजकीय इच्छाशक्ती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून राष्ट्रीय सुरक्षा मजबूत केल्याचं गृहमंत्री म्हणाले.

गेल्या पाच वर्षात 14 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्यांचे 23 हजार किलोग्राम संमिश्र अमली पदार्थ नष्ट केल्याचं सांगून अमित शहा म्हणाले की, अमली पदार्थांचा धोक्याला तोंड देण्यासाठी आणि अफूच्या लागवडीला प्रतिबंध घालण्यासाठी ड्रोन, उपग्रह आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. राज्यसभेत काल गृहमंत्रालयाच्या अखत्यारीतील विविध विषयांवर प्रश्नोत्तरे झाली. गृहमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरानंतर सभागृह दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**कृषी अनुदान**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे आणि शेतकरी कल्याणाला सरकार प्राधान्य देत असल्याचं काल संसदेत स्पष्ट केलं. 2025-26 या चालू वर्षाच्या कृषी मंत्रालयाच्या अनुदान मागणीवर लोकसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना चौहान बोलत होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने गेल्या दहा वर्षात अर्थसंकल्पात दहा लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी वितरीत केला आहे. डिजीटल कृषी धोरणाअंतर्गत, देशातल्या प्रत्येक शेतकऱ्याला एक डिजीटल ओळखपत्र दिले जाईल, ज्यामुळे शेतकरी विविध सरकारी योजनांचा लाभ घेऊ शकतील असे चौहान यांनी सांगितले. पंतप्रधान पीक विमा योजनेमुळे नैसर्गिक आपत्तीमुळे धान्यपिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना व्यापक सुरक्षा प्रदान होईल.

**मंत्रालय अनुदान**

2025-26 या वर्षासाठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात विविध मंत्रालयांच्या अनुदान मागण्या काल लोकसभेत मंजूर करण्यात आल्या. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी रसायने आणि खते, वीज, वाणिज्य आणि उद्योग, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, माहिती आणि प्रसारण तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अनुदान मागण्या विनाचर्चा मंजूर केल्या. त्यानंतर अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी मांडलेल्या विनियोजन विधेयक 2025 ला मंजुरी देण्यात आली.

**विधीमंडळ कामकाज**

2025-26 या आर्थिक वर्षासाठीचा महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी काल मंजूर केला. विधानसभेत अर्थसंकल्पातल्या अनुदानाच्या विभागवार मागण्यांवर चर्चा झाली आणि त्या मंजूर झाल्या. त्यानंतर अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र विनियोजन विधेयक सादर केलं आणि ते सभागृहानं एकमतानं मंजूर केलं. विधान परिषदेनेही या विधेयकाला मान्यता दिली.

**जलदीन**

आज 22 मार्च, जागतिक जल दिन. 1992 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघानं ब्राझीलमधील रिओ दि जानेरो इथं आयोजित केलेल्या पर्यावरण आणि विकास विषयक परिषदेत 22 मार्च हा दिवस जागतिक जलदिन म्हणून अधिकृतपणे घोषित करण्याचा ठराव संमत करण्यात आला. 'हिमनदयांचं संवर्धन' ही यंदाच्या जागतिक जलदिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. वेगानं वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे पाण्याच्या प्रवाहात अनिश्चितता निर्माण होत असून, त्याचा मानवी जीवनावर आणि नैसर्गिक परिसंस्थेवर परिणाम होत आहे. म्हणूनच आजच्या जागतिक जलदिनानिमित्त हवामान बदल आणि जागतिक जलसंकटाचा सामना करण्याच्या आपल्या विविध उपाययोजनांसोबत हिमनद्यांचं संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचं आवाहन करण्यात येत आहे. जागतिक जल दिनानिमित्त आज जल संवर्धनाबात जनजागृती करण्यासाठी देश-विदेशात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**हिथ्रो**

लंडनमधील सर्वात मोठ्या हिथ्रो विमानतळाचा वीजपुरवठा सुरळीत झाला असून आता विमानसेवा पूर्ववत सुरू झाली असल्याचं या विमानतळाचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. विमानतळाची वीज काल खंडीत झाल्यानंतर

हवाईवाहातूक दिवसभरासाठी बंद ठेवण्यात आली. विमानसेवा विस्कळीत झाली. वीजपुरवठा करणाऱ्या उपस्थानकाला आग लागल्यानं वीज पुरवठा खंडीत झाला होता.

**गाझा**

इस्रायल आणि गाझामधील युद्धविराम संपल्यानंतर दोन्ही देशांतील तणाव वाढत चालला आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काटझ् यांनी सैन्याला गाझाची अधिक भूभाग ताब्यात घेण्याचे आदेश दिले आहेत. पॅलेस्टिनी भूभागातून ताब्यात घेतलेल्या उर्वरीत ओलिसांना मुक्त करत नाही तोपर्यंत तो भूभाग अंशतः ताब्यात घेण्याची धमकी दिल्याचं स्थानिक वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. या भागातील कारवाई वाढत असल्याची पुष्टी इस्रायली सैन्याने केली आहे. इस्रायलने नव्याने केलेल्या हल्ल्यात 590 हून अधिक पॅलिस्टिनी मारले गेले असल्याचं पॅलेस्टिनच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**बॅँडमिंटन**

बॅँडमिंटनमध्ये स्विस खुल्या विश्वकरंडक स्पर्धेच्या भारताच्या ट्रीसा जॉली आणि तिची जोडीदार गायत्री गोपीचंद महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत हाँगकाँगच्या जोडीशी खेळतील. भारतीय जोडीने काल उपउपांत्यपूर्व सामन्यात जर्मनीच्या जोडीचा पराभव केला.

**सेपाकतक्रो**

बिहारच्या पाटणामध्ये झालेल्या विश्वचषक 2025 स्पर्धेत झालेल्या सेपाक तक्रो या क्रीडाप्रकारात पुरुष आणि महिला संघांनी क्वाड स्पर्धेत कास्यपदक पटकावले. भारतीय पुरुष संघाला व्हिएतनामकडून 1-2 असा पराभव पत्करावा लागला. भारतीय महिला संघाला पहिल्या क्रमांकाच्या थायलंडविरुद्ध पराभव पत्करावा लागला.

**खेलो इंडिया**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत काल महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 3 सुवर्ण पदकं आणि 1 रौप्य पदक मिळवलं. अकोल्याच्या चैतन्य पाठकनं 100 मीटर धावण्याच्या शर्यतीत, तर कराडच्या साहिल सय्यद आणि पुण्याच्या सिध्दी क्षीरसागरनं गोळाफेकीत सुवर्णपदक पटकावलं. मीनाक्षी जाधव हिनं गोळाफेकीत रौप्यपदक मिळवलं. बॅडमिंटनमध्ये आरती पाटील आणि सुकांत कदम यांनी आपापल्या गटात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**स्क्वॅश**

चेन्नईत सुरू असलेल्या पीएसए चॅलेंजर स्क्वॅश स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंह हिने महिला गटात तर वीर चोत्राणी याने पुरूष गटात विजेतेपद पटकावले. तिसऱ्या मानांकित अनाहत सिंगने अंतिम सामन्यात अव्वल मानांकित आकांक्षा साळुंखेचा पराभव केला. तर दुसऱ्या मानांकित वीर चोत्राणीने अंतिम सामन्यात फ्रेंच खेळाडू मेल्विल सायनिमानिकोचा पराभव केला.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार